जून २१, २००४

आर बी आय / २००४ / २५९
डी. बी. ओ. डी. ए. एम. एल. बी. सी. नं. १०१/१४.१.०१/२००३-०४

सर्व वाणिज्य बँकाचे मुख्य कार्यकारी अधिकारी
(आर. आर. बी सोडून)

प्रिय महोदय,

**अस्तित्वात असलेली खाती – केवायसी साठी मार्गदर्शकतत्वे**

१) वर नमूद केलेल्या विषयाच्या संदर्भात आमचे परिपत्रक डी बी ओ डी नं. ए एल एस बी सी. १८/१४.०१.०११/२००२-०३ दि. १६ ऑगस्ट २००२ पहावे. त्याच्या परिच्छेद ३ प्रमाणे असे कळविले होते की सध्या असलेल्या खात्यांचे संदर्भात, काही गाळलेले आढळल्यास, लवकरात लवकर केवायसी पद्धतीचा अवलंब करुन पूर्ण कराव्यात. दिनांक नोव्हेंबर २४ व डिसेंबर १६ २००३ च्या परिपत्रके डी. बी. ओ. डी. ए. एम. एल. ४१/१४.१.०१/२००३-०४ व १२९/१४.१.०१/२००३-२००४ दि. नोव्हेंबर २४ व डिसेंबर १६ २००३ प्रमाणे जी कालमर्यादा दिली आहे त्या प्रमाणे सर्व बँकांना केवायसी पद्धतीचा सध्याच्या खात्यांचे संदर्भात अवलंब करण्यास सुचविले होते.

२) यासाठी आपण, २००४-०५ च्या वार्षिक धोरणाच्या निवेदनाचा परिच्छेद क्रं. १२६ पहावा. त्याच बरोबर मा. गव्हर्नर यांचे पत्र एम पी डी. बी. सी. २४१/०७.०१.२७९/२००३-०४ दि. १८ मे २००४ पहावे. सोबत परिच्छेदाची प्रत जोडली आहे.

३) आपण केवायसी धोरणाचा उपयोग नवीन खाती उघडण्या करण्याबाबत आपल्या संचालकांबरोबर नक्कीच चर्चा केली असेल, असा आम्हाला विश्वास आहे. जुन्या अल्प खातेदारांची गैरसोय होऊ नये आणि केवायसी पद्धती वेळेत पूर्ण व्हावी, या साठी असा निर्णय घेण्यात आला आहे की, केवायसी पद्धती साठी बँकांनी मर्यादित खातेदारा अर्ज, ज्यांच्या खात्यामधे रु. १० लाखापेक्षा जास्त, व्यापारी वर्ष जो ३१ मार्च २००३ अखेरीस संपते, किंवा खात्यांचे वापराबाबत शंका आहे, ते अर्ज स्वीकारावेत. हे काम ३१ डिसेंबर २००४ पर्यंत पूर्ण करण्यात यावे.

४) केवायसी पद्धतीसाठी सध्या कंपन्या / फर्मस, धार्मिक / धर्मादाय संस्था, इतर संस्था आणि ज्या संस्था मुखत्यार द्वारे काम करतात त्या सर्व संस्थांचे अर्ज बँकांनी स्विकारणे तसेच ३१ डिसेंबर २००४ पर्यंत केवायसी पद्धतीचा वापर सर्व स्थानिक परिस्थितीत अनुकूल होईल असा करावा.

**आपला विश्वासू**
**प्रशांत सरन**
**मुख्य महाव्यवस्थापक**

**साल २००४-०५ च्या वार्षिक धोरण अहवालामधील उतारा**

***१) केवायसी आणि खातेदारांच्या संबंधाची गोपनीयता***

१२६ गेल्या काही वर्षांत काळा पैसा उजळ करण्यावर बंधन आणणे जास्त महत्वाचे झाले आहे. "तुमच्या खातेदाराला ओळखा!" हे तत्व म्हणजे, बँकांनी या दिशेने उचललेले आणखी एक पाऊल आहे. त्यामुळे काळा पैसा वैध करणे व दहशतवादाला आर्थिक पाठिंबा देणे या दोन्ही गोष्टीं विरुद्ध लढता येईल. ऑगस्ट २००२ मधे बँकांना योग्य अशी केवायसी पद्धत पूर्ण करण्याचा सल्ला देण्यात आला होता. या पद्धतीतून योग्य कागदपत्रांनी खातेदाराची ओळख पटवणे, व त्याच वेळी अशा पद्धतीमुळे आम जनतेला बँकिंग सेवांपासून वंचित न ठेवणे, या दोन्ही गोष्टी साधावयाच्या होत्या. नंतर डिसेंबर २००२ मधे बँकांना ऑगस्ट २००२ पूर्वी उघडलेल्या खात्यांनाही ही पद्धत लागू

करण्यास व त्यासाठी लागणारी कार्यवाही खातेदारांकडून करुन घेण्याचा सल्ला देण्यात आला. हे काम टप्प्याटप्प्याने डिसेंबर २००४ पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. या संदर्भात कळवण्यात येते कीः-

बँकांनी त्यांच्या संचालकमंडळाने ठरवलेल्या केवायसी पद्धतिनुसार नवीन खाती उघडावीत; ही पद्धत विद्यमान खात्यांना जमा / नांवे एकूण रक्कम रु. १० लाखापेक्षा जास्त किंवा जेथे व्यवहार असाधारण व संशयास्पद वाटतील अशा खात्यांना लागू करावी.

बँकांनी केवायसी पद्धत सर्व विश्वस्त संस्था, मध्यस्थ (दलाल) यांची खाती व आदेश किंवा मुखत्यारपत्राने चालवलेली खाती यांना लागू करावी. केवायसी पद्धत स्थानिक परिस्थितीस धरुन असावी व डिसेंबर २००४ पर्यंत अमलात आणली जावी.